महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ अंतर्गत लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी व नियत कालमर्यादा अधिसूचित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- मलोह-२०१५/प्र.क्र. ७७ /उद्योग-६.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०१ जानेवारी, २०२१.

वाचा : १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५)
२) शासन निर्णय समक्रमांक दि.२३ जुलै,२०१५
३) शासन निर्णय समक्रमांक दि.११ सप्टेंबर,२०१८
४) उद्योग संचालनालयाचे क्र.उसं/आस्था/मलोह/से.अधि./२०२०/ए-१०७७.
दि.२५ नोव्हेंबर, २०२० चे पत्र.

**प्रस्तावना:-**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तप्तर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५, दि.२८.४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम - ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितिय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करून त्याप्रमाणे सेवा पुरवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२. या विभागाच्या संदर्भ क्र.२ च्या शासननिर्णयान्वये विभागामार्फत १९ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या असून,संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये उद्योग संचालनालयाच्या दि.२३ जुलै, २०१५ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांपैकी ३ सेवा वगळण्यात आलेल्या आहेत. उद्योग संचालनालयाने त्यांच्या संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये अतिरिक्त ९ सेवा अधिसूचित करण्याची शासनास विनंती केलेली आहे. त्यामुळे या सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ नुसार अधिसूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

या शासननिर्णयाच्या सहपत्र - अ मध्ये नमुद करण्यात आलेल्या ९ सेवा विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ मधील कलम - ३ नुसार अधिसुचित करावयाच्या आहेत.

२. या अधिनियमांतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना मुभा राहील. तसेच संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना सेवा विचारात घेवून पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितिय अपिलीय अधिकारी इत्यादींमध्ये सुधारणा करता येईल.

३. विकास आयुक्त (उद्योग),उद्योग संचालनालय , मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे कलम - ३ अनुसार अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२१०१०५११४५२८८४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY
SHANKARRAO INGLE

Digitally signed by SANJAY SHANKARRAO INGLE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f0d616600e4d2f510d1c8cc19813e070ad282d2275bf6f c132a28ee97f14e0a6, cn=SANJAY SHANKARRAO INGLE
Date: 2021.01.05 11:50:09 +05'30'

( संजय इंगळे )

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
७. मा.लोक-आयुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
८. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
९. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
१०. मा.मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी.
११. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक.
१२. निवड नस्ती (उद्योग-६).

..............................................................

## उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.मलोह-२०१५/ प्र.क्र.७७/उद्योग - ६, दि.१ जानेवारी, २०२१ चे सहपत्र.

### सहपत्र - "अ"

### ( विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, यांनी अधिसूचित करावयाच्या सेवांचा तपशिल )

| क्र. | सार्वजनिक सेवांचा तपशिल | आवश्यक कागदपत्र | शुल्क | विहित मुदत | नियुक्त अधिकारी | प्रथम अपिलिय अधिकारी | द्वितीय अपिलिय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **खरेदी सबंधित** | | | |
| १ | ऑनलाईन निविदा प्रकाशन आणि सादरिकरण | ऑनलाईन पोर्टल नोंदणी आणि/फि भरणे,ज्याप्रमाणे लागू आहे. कागदपत्रे बयाणा रककम | ज्याप्रमाणे लागू असेल | निविदा आमंत्रित करण्याची नोटीस/वृत्तपत्रातील जाहिरात यांच्या प्रकाशनापासून ३५ दिवस | उपसंचालक/सह संचालक (उद्योग) | उद्योग सह संचालक/अतिरिक्त उद्योग संचालक | विकास आयुक्त (उद्योग) |
| | | | **निविदा टप्पा** | | | | |
| २ | करार/वर्क ऑर्डर/लेटर ऑफ इस्टेट यातील लागू आहे ते देय करणे | निरंक | निरंक | निविदा प्रकाशनापासून १८० दिवस | उद्योग सह संचालक | अतिरिक्तं उद्योग संचालक/ विकास आयुक्त (उद्योग) | विकास आयुक्त (उद्योग)/मुख्य सचिव (उद्योग) |
| | | | **निविदा पूर्व टप्पा** | | | | |
| ३. | बयाणा रक्कमेचा भरणा/परतावा/जप्ती यातील जे लागु असेल ते | निरंक | निरंक | निविदा स्वीकृती आदेश जारी केल्यापासून २ महिने | उद्योग सह संचालक | विकास आयुक्त (उद्योग) | प्रधान सचिव (उद्योग) |
| **सामूहिक प्रोत्साहन योजना** | | | | | | | |
| ४ | सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत मुद्रांक शुल्क सवलत | ऑनलाईन सिस्टिम मध्ये विहित केल्याप्रमाणे | नाही | ७ दिवस | अधीक्षकीय उद्योग अधिकारी /उद्योग उप संचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक / उद्योग सह संचालक | विकास आयुक्त (उद्योग) / अतिरिक्त उद्योग संचालक |
| ५ | सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र देणे | ऑनलाईन सिस्टिम मध्ये विहित केल्याप्रमाणे | नाही | 30 दिवस | अधीक्षकीय उद्योग अधिकारी /उद्योग उप संचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक / उद्योग सह संचालक | विकास आयुक्त (उद्योग) / अतिरिक्त उद्योग संचालक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान | ऑनलाईन सिस्टिम मध्ये विहित केल्याप्रमाणे | नाही | १५ दिवस | अधीक्षकीय उद्योग अधिकारी /उद्योग उप संचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक / उद्योग सह संचालक | विकास आयुक्त (उद्योग) / अतिरिक्त उद्योग संचालक |
| ७ | अनुदान वाटपाची पध्दती | आवश्यकता नाही | नाही | उद्योग संचालनालयाकडे निधी प्राप्त झाल्यानंतर ३०. दिवस | अधीक्षकीय उद्योग अधिकारी /उद्योग उप संचालक/ महाव्यवस्थापक | अतिरिक्त उद्योग संचालक / उद्योग सह संचालक | विकास आयुक्त (उद्योग) / अतिरिक्त उद्योग संचालक |
| **मैत्री द्वारे प्रदान केलेल्या सेवांचे तपशील** | | | | | | | |
| ८ | गुंतवणुकदारांची महाराष्ट्रातील उद्योगांच्या परिस्थतीबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांना/सरकारकडुन प्रदान केलेल्या व्यवसाय सेवा/ विशिष्ट प्रश्न अर्जाबाबतच्या प्रश्नांना प्रतिसाद देणे | नाही | नाही | ऑनलाईन प्रश्न सादर करण्याच्या तारखेपासून १५ दिवस | अधीक्षकीय उद्योग अधिकारी (मैत्री) | अतिरिक्त उद्योग संचालक | विकास आयुक्त (उद्योग) व अध्यक्ष, मैत्री |
| ९. | सरकारकडून व्यवसाय सेवा मिळविण्यासाठी ऑनलाईन प्राप्त झालेल्या आर्जावरील त्रुटी गुंतवणूकदारास कळविणे | नाही | नाही | अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ दिवस | अधीक्षकीय उद्योग अधिकारी (मैत्री) | अतिरिक्त उद्योग संचालक | विकास आयुक्त (उद्योग) व अध्यक्ष, मैत्री |

The English translation of the notified timelines under Maharashtra RTPS Act 2015 for Procurement, Incentives and Query are as given below:

**Particulars of Services notified by the Industries Department for Procurement:**

| Sr. No. | Particulars of Public Service | Necessary Documents | Fees | Prescribed Time Limit | Designated Officer | First Appellate Authority | Second Appellate Authority |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Procurement related** | | | | | | | |
| **Pre-Tender Stage:** | | | | | | | |
| 1. | Online Tender Publication and submission | Online Portal Registration and/ or Fee Payment, as applicable, documents, EMD | As applicable | 35 days from Date of Online Publication of Notice Inviting Tender (NIT)/ Newspaper Advertisement | Deputy Director/ Joint Director of Industries | Joint Director of Industries/ Additional Director of Industries | Development Commissioner of Industries |
| **Tender Stage:** | | | | | | | |
| 2. | Award of Contract/ Work Order or Grant of Letter of Intent (LoI), as applicable | None | None | 180 days from the Date of Publication of Tender | Joint Director of Industries | Additional Director of Industries/ Development Commissioner of Industries | Development Commissioner of Industries/ Principal Secretary of Industries |
| **Post-Tender Stage:** | | | | | | | |
| 3. | The Amount Earnest Money Deposit Return/ Forfeit, as applicable | None | None | 2 Months from issuing Acceptance Order of Tender | Joint Director of Industries | Development Commissioner of Industries | Principal Secretary of Industries |

**Particulars of Services notified by the Industries Department for Incentives:**

| Sr. No. | Particulars of Public Service | Necessary Documents | Fees | Prescribed Time Limit | Designated Officer | First Appellate Authority | Second Appellate Authority |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Stamp Duty Exemption Certificate under Package scheme of Incentive 2019 | As prescribed in the online system | None | 7 Days | Superintending officer-Industries/ Deputy Director - Industries/ General Manager | Additional Director-Industries/ Joint Director - Industries | Development Commissioner (Industries)/ Additional Director-Industries |
| 2. | Grant of Eligibility Certificate under Package scheme of Incentive 2019 | As prescribed in the online system | None | 30 Days | Superintending officer-Industries/ Deputy Director - Industries/ General Manager | Additional Director-Industries/ Joint Director - Industries | Development Commissioner (Industries)/ Additional Director-Industries |
| 3. | Industrial Promotion Subsidy under Package scheme of Incentive 2019 | As prescribed in the online system | None | 15 Days | Superintending officer-Industries/ Deputy Director - Industries/ General Manager | Additional Director-Industries/ Joint Director - Industries | Development Commissioner (Industries)/ Additional Director-Industries |
| 4. | Disbursal of Incentives | None | None | 30 days from the date of availability of fund with Directorate of Industries | Superintending officer-Industries/ Deputy Director - Industries/ General Manager | Additional Director-Industries/ Joint Director - Industries | Development Commissioner (Industries)/ Additional Director-Industries |

**Particulars of Services notified by MAITRI for Query resolution:**

| Sr. No. | Particulars of Public Service | Necessary Documents | Fees | Prescribed Time Limit | Designated Officer | First Appellate Authority | Second Appellate Authority |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Response to queries raised by the investor on industry scenario in Maharashtra/ Government to Business services/ application-specific queries | None | None | 15 days from the date of online submission of queries | Desk-1, MAITRI Cell | Desk-2, MAITRI Cell | Chairman, MAITRI Cell |
| 2. | Sending queries to investor on the applications received online for seeking Government to Business services | None | None | 7 days from the date of receipt of application form | Desk-1, MAITRI Cell | Desk-2, MAITRI Cell | Chairman, MAITRI Cell |